महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
Web:www.dhepune.gov.in
E-mail : bed.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११५३

क्रमांक उशिसं/२०१९/प्र.क्र.७१/२०१८/सीईटीसेल/ 1451 दिनांक १९.०१.२०१८

28 JAN 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

विषय : कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत . .

संदर्भ : १. शासनपत्र क्र. बीएड-४६१५/प्र.क्र.(५)/मशि-२, दिनांक २७.०७.२०१७.
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/बी.एड./प्र.क्र.७१-१७/सीईटीसेल/९३२९, दिनांक ०१.०८.२०१७
३. शासनपत्र क्र. बीएड-४६१५/प्र.क्र. ३३२(४)/मशि-२, दि. १२.०७.२०१८

वरील विषयांकित प्रकरणी शासनस्तरावरुन प्राप्त निर्देशानूसार आपणामार्फत करावयाच्या कार्यवाहीच्या सुचना संचालनालयाचे पत्र दिनांक ०१.०८.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे -

a. आपल्या कार्यक्षेत्रातील शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांच्या केलेल्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व एन.सी.टी.ई / आर.सी.आय. ने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता तीन महिन्यांच्या कालावधीत करण्याबाबत तात्काळ संबंधित महाविद्यलायांना कळविण्यात यावे, व त्याची प्रत संचालनालयास पाठविण्यात यावी. संबंधित महाविद्यालयांनी सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता तीन महिन्यांच्या कालावधीतच करावी.
b. तद्नंतर आपण पूर्वी केलेल्या तपासणीत निदर्शनास आलेल्या त्रुटी व एन.सी.टी.ई. / आर.सी.आय ने विहित केलेल्या सुधारित निकषांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने विभागीय स्तरावर समिती गठीत करुन संबंधित महाविद्यालयांची प्रत्यक्षात तपासणी दोन महिन्यात करुन त्याबावतचा अहवाल आपल्या अभिप्रायासह कोणत्याही परिस्थितीत दिनांक २७ डिसेंबर, २०१७ पर्यंत संचालनालयास सादर करावा.
c. ज्या महाविद्यालयांकडून सदर त्रुटींची पूर्तता व सुधारित निकषांची पूर्तता उक्त कालावधीत करण्यात येणार नाही, त्या महाविद्यालयांची नावे एन.सी.टी.ई./ आर. सी. आय. यांना कळविण्यात येतील, तसेच या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब संबंधित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.
d. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ करिता ना-हरकत प्रमाणपत्र देताना आपण केलेल्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटी आपणामार्फत संबंधित महाविद्यालयास

कळविण्याबाबत सूचना देऊनही सदर त्रुटी संबंधित महाविद्यालयास कळविण्यात आल्या नाहीत, ही गंभीर बाब आहे. सबब याबाबत आपला खुलासा संचालनालयास सादर करण्यात यावा. तसेच, याबातीत संबंधित विद्यापीठांकडूनही वस्तुनिष्ठ अहवाल घेवून संचालनालयास सादर करावा.

२. तथापि, उक्त सुचनांनूसार कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात आलेला नाही. मात्र, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासंबंधीचा प्रस्ताव व महाविद्यालयांची यादी संचालनालयास सादर करण्यात आली आहे. ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी आपणाकडून संचालनालयाकडे सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने संचालनालयाद्वारे शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता शासनाचे सुधारित ना-हकरत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या महाविद्यालयांपैकी आपणामार्फत सकारात्मक शिफारस केलेल्या, राज्यातील कायम विनाअनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र , शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना खालील अटींच्या अधीन राहून राज्य शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची मुदत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता वाढवुन देण्यात आली आहे.

१. अल्पसंख्याक महाविदयालयांच्या बाबतीत बी.एड/ एम.एड अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२३.०५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब) व (क) मधील तरतुदी विहित केलेल्या अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

२. सर्व विभागीय सहसंचालकांना शारीरिक शिक्षण महाविदयालयाच्या तपासणी दरम्यान् निदर्शनास आलेल्या त्रुटींची व एन.सी.टी.ई ने विहित केलेल्या सुधारित निकषांची पुर्तता करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विदयापीठाची राहील.

३. ज्या महाविदयालयाकडून सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता करण्यात येणार नाही, त्या महाविदयालयांची नावे एन.सी.टी.ई ला कळविण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब संबंधित महाविदयालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

४. एन.सी.टी.ई कडून होणाऱ्या तपासणी दरम्यान, एन.सी.टी.ई च्या सुधारित निकषांची पुर्तता न केल्याच्या कारणास्तव सदर महाविदयालयातील अभ्यासक्रमांची मान्यता रद्द केल्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

**सोबत:** बी.एड, एम.एड, बी.पी.एड व एम.पी.एड महाविदयालयांची यादी.

(डॉ.मोहन खताळ)
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत:१. कुलसचिव, सर्व अकृषी विदयापीठ, महाराष्ट्र राज्य.
२.सर्व संबंधित कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविदयालये (विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | [illegible] महाविद्यालय, खुलताबाद, जि. औरंगाबाद | | |
| ४२ | एव्हरेस्ट एज्यु. सोसायटी. | | | १ |
| ४३ | श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळ, कहांब, औरंगाबाद | धनेश्वरी अध्यापक महाविद्यालय, गेवराई तांडा, पैठण रोड, औरंगाबाद. (एस.एन.डी.टी. विद्यापीठ). | | २ |
| ४४ | उमरदीन खलील वेल्फेअर ट्रस्ट, | आमुबाई अलाना महिला अध्यापक महाविद्यालय, कुंजखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. (एस.एन.डी.टी. विद्यापीठ) | | १ |
| ४५ | विवेकानंद शिक्षण संस्था | अध्यापक महाविद्यालय, उस्मानाबाद, | | १ |
| ४६ | मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटी, औरंगाबाद | मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, रोजाबाग, औरंगाबाद | | ४ |
| ४७ | आदर्श शिक्षण संस्था, बीड | महिला अध्यापक महाविद्यालय, पेठ, बीड | | १ |
| ४८ | भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्था, औरंगाबाद | महिला अध्यापक महाविद्यालय, एन.आय.डी.सी., चिकलठाणा, औरंगाबाद | | २ |